मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेची आरक्षण सोडतीसाठी सर्व तयारी पूर्ण!

## पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर सोडत त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूक विभागाची तयारी पूर्ण झाली आहे.




महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडतीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज प्राधिकृत अधिकारी डॉ. पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली रंगीत तालीम देखील पार पडली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे, स्मार्ट सिटीचे सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पोलीस निरीक्षक अंकुश बांगर तसेच निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेले महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार यांनी आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाने केलेल्या तयारीची संपूर्ण माहिती घेतली. तसेच आरक्षण सोडतीच्या दिवशी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. यावेळी पोलीस प्रशासन व महापालिकेच्या सुरक्षा विभागाच्या वतीने ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.

### शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी

» ११ नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबर रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह परिसरात शासकीय वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी असणार आहे. तरी आरक्षण सोडतीच्या ठिकाणी खासगी वाहने आणू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### चार टप्प्यात पार पडणार आरक्षण सोडत

» पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभागांमध्ये राखीव जागा वाटप करून नियम २०२५ नुसार प्रथम अनुसूचित जाती महिला आरक्षण सोडत काढणे.
» अनुसूचित जमाती महिला आरक्षण सोडत काढणे.
» नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढणे व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांकरीता वाटप करणे. नियमानुसार कारवाई करणे.
» सर्व साधारण महिलांकरीता जागा नेमून देणे.

# आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसनिमित्त रक्तदान!

## सोसायटी फेडरेशनचा आदर्श: 470 रक्तदात्यांच्या सहभागाने समाजसेवेचे जपले व्रत

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीचे नेते आणि आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात विक्रमी प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ५६९ नागरिकांनी नोंदणी केली, तर त्यापैकी ४७० पात्र रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा उज्ज्वल आदर्श घालून दिला.

सध्या पिंपरी चिंचवड शहरातील विविध रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांना जीवदान मिळावे आणि शहरातील रक्तसाठा वाढावा, यासाठी सोसायटी फेडरेशनने हा सामाजिक उपक्रम राबवला. या शिबिरात शहरातील विविध सोसायट्यांतील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पुरुषांसह महिला रक्तदात्यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

या उपक्रमामुळे फेडरेशनच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत असून, समाजहितासाठी संघटित प्रयत्नांचे



हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे

पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, “आमच्या फेडरेशनने घेतलेल्या या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने आम्ही आनंदित आहोत. पुरुषांसोबत महिला भगिनींचाही सक्रिय सहभाग विशेष उल्लेखनीय आहे. रक्तदात्यांच्या या योगदानामुळे अनेकांना नवजीवन मिळणार आहे. भविष्यातही समाजहिताचे, देशहिताचे असे विविध उपक्रम राबवण्याचा फेडरेशनचा संकल्प आहे.”

> “ पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हा आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील सर्व घटक—पुरुष, महिला, तरुण—सर्वांनीच उत्साहाने सहभाग घेतला आणि विक्रमी रक्तदानाची नोंद घडवली. हे केवळ रक्तदान नाही, तर समाजातील ऐक्य, सहकार्य आणि मानवी संवेदनांचे प्रतीक आहे. फेडरेशन तर्फे सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. आगामी काळातही आम्ही समाजहिताचे, जनजागृतीचे आणि राष्ट्रनिर्मितीला हातभार लावणारे अनेक उपक्रम राबवणार आहोत.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# महापालिकेला केंद्र सरकारचा ‘शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार’

## हरित वाहतूक, सायकल मार्ग व पादचारी उपक्रमांची राष्ट्रीय स्तरावर दखल




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक शहरी वाहतूक व्यवस्थेसाठी राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. या उपक्रमांसाठी महापालिकेला केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयामार्फत “शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार” प्रदान करण्यात आला आहे.

नवी दिल्ली येथे झालेल्या अर्बन मोबिलिटी परिषदेत केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी, केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार राज्यमंत्री तोखन साहू, भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे सचिव श्रीनिवास कटिकिथला, विशेष कार्यकारी अधिकारी जयदीप यांच्यासह केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनिल पवार तसेच आयटीडीपी इंडिया संस्थेचे प्रांजल कुलकर्णी आणि आशिक जैन यांनी हा सन्मान स्वीकारला. “सर्वाधिक नाविन्यपूर्ण वित्तीय यंत्रणा असलेले शहर” या श्रेणीत हा पुरस्कार महापालिकेला प्राप्त झाला आहे.

> २०३६ पर्यंत पिंपरी चिंचवड शहरातील जवळच्या अंतरावरील प्रवास पायी, व सायकलने आणि दुर अंतरावरील सार्वजनिक वाहतुकीने करणे शक्य होईल, हे उद्दिष्ट समोर ठेवून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या दिशेने हरित सेतू आणि टेल्को रोड प्रकल्प हे महत्त्वाचे टप्पे आहेत. आगामी काळात संपूर्ण शहर ‘१५ मिनिटांचे शहर’ या संकल्पनेनुसार विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
>
> **– बापू गायकवाड, सहशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे शहरात शाश्वत वाहतूक व्यवस्थेची पायाभरणी झाली आहे. हरित सेतू व टेल्को रोडसारखे प्रकल्प हे केवळ पायाभूत सुविधा नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी,आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे नेणारे उपक्रम आहेत. केंद्र सरकारकडून मिळालेला ‘शहरी वाहतूक उत्कृष्टता पुरस्कार’ हा पिंपरी चिंचवडच्या सर्व नागरिकांचा आहे आणि भविष्यातील शाश्वत विकासाच्या दिशेने आमच्या बांधिलकीला बळ देणारा आहे.
>
> **– श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> पिंपरी चिंचवड महापालिकेने शाश्वत शहरी वाहतुकीसाठी वित्तीय स्वावलंबनाचा अभिनव मार्ग अवलंबला आहे. ग्रीन बॉण्डमुळे प्रकल्पांसाठी आवश्यक निधी वेळेवर उपलब्ध झाला आणि विकासाच्या गतीत मोठी वाढ झाली. हा पुरस्कार म्हणजे आपल्या प्रयत्नांना मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील मान्यता आहे. हा सन्मान नागरिकांच्या सहभागानेच शक्य झाला.
>
> **– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# पुररेषेची चिंता सोडा, एका स्क्वेअर फुटालाही धक्का लागणार नाही: शंकर जगताप

## गृहरचना संस्थांच्या संवाद मेळाव्यात निळ्या पूररेषेसंदर्भात आमदारांकडून सोसायटीधारकांना दिलासा




**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड मतदार संघातील निळ्या पूररेषेसंदर्भात राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. हा प्रश्न राज्यस्तरीय असून त्यावर एकसंध धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी तज्ञ अधिकाऱ्यांची समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतरच निळ्या पूररेषेसंदर्भात धोरणात्मक निर्णय होणार असल्यामुळे नागरिकांनी नाहक चिंता करण्याची गरज नसल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. दरम्यान चिंचवड परिसरातील अधिकृत बांधकामांच्या “एका स्क्वेअर फुटा”लाही धक्का लागणार नाही असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले.

चिंचवड येथे रविवारी (दि.९) निळी पूररेषा बाधित गृहरचना संस्था, अपार्टमेंट येथील नागरिकांच्या समस्यांबाबत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार शंकर जगताप बोलत होते. यावेळी परिसरातील आजी माजी नगरसेवक, सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार जगताप म्हणाले निळी तसेच लाल पूररेषा या संदर्भात राज्य शासन स्तरावर पाठपुरावा केला जात आहे, या अनुषंगाने अनेक मागण्या देखील शासनाकडे मांडल्या आहेत.पूररेषेतील अधिकृत बांधकामांना पुनर्विकासासह अतिरिक्त टीडीआर वापरण्याची परवानगी द्यावी आणि एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (यूडीसीपीआर) सुधारणा करून नागरिकांना न्याय द्यावा. तसेच चुकीच्या पद्धतीने दिलेल्या परवानग्यांवर चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. हि मागणी केलेली आहे. हा प्रश्न फक्त चिंचवडपुरता नव्हे तर संपूर्ण राज्यातील “ब्ल्यू लाईन,रेड लाईन” क्षेत्रांचा आहे. म्हणूनच यासंदर्भात राज्यस्तरावर एकसंध धोरण तयार करण्याची गरज असल्याचे शासनाने मान्य केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यासंदर्भात जलसंपदा, नगरविकास व पर्यावरण विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ही समिती “ब्ल्यू लाईन आणि रेड लाईन” क्षेत्रांचा पुन्हा सर्वेक्षण करेल आणि त्यानुसार पूररेषांचे नवे मापन करून वास्तवातील परिस्थितीचा अभ्यास सादर करेल. या समितीचा अहवाल आल्यानंतर शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, ज्यामुळे आताच्या अधिकृत इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देण्याचा मार्ग मोकळा होईल. यातून पिंपरी चिंचवड महापालिकेला सुमारे १२०० कोटी रुपयांचा महसूल देखील प्राप्त होणार आहे.

आमदार जगताप पुढे म्हणाले, मंत्रालय पातळीवर प्रत्येक विभागांमध्ये या संदर्भात पत्रव्यवहार सुरू असून, जलसंपदा विभागाकडून पुन्हा सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सर्व्हेमध्ये पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीलगत असलेल्या गावांतील पूररेषा नव्याने निश्चित केली जाणार आहे. वास्तविक जोते पातळी, नदी प्रवाह आणि बांधकाम स्थिरता यांचा तांत्रिक अभ्यास होणार आहे. त्यामुळे जी बांधकामे गेल्या २५ वर्षांपासून अधिकृत रित्या बांधलेली आहेत. त्या बांधकामांबाबत नागरिकांना चिंता करण्याची गरज नाही. चिंचवड परिसरातील या अधिकृत बांधकामांच्या “एका स्क्वेअर फुटा”लाही धक्का लागणार नाही असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले. नवीन बांधकाम परवानगी सोडून निवडणुकांपूर्वी नागरी सुविधांबाबत नागरिकांना कोणतीही अडचण राहणार नाही. मूलभूत सुविधांच्या संदर्भात एकही काम प्रलंबित राहणार नाही असे आश्वासन यावेळी जगताप यांनी दिले.

### मेळाव्यातून सोसायटीधारकांना मोठा दिलासा..

» मेळाव्यामध्ये आमदार शंकर जगताप यांनी शासन स्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्या संदर्भात माहिती दिली. यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला असल्याची भावना सोसायटीधारकांनी व्यक्त केली. आमदारांकडून शासन स्तरावर निळ्या पूररेषेबाबत मोठा पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे हा प्रश्न निकालात निघेल असा विश्वास सोसायटी धारकांनी व्यक्त केला.

# भटक्या श्वानांना बसवणार मायक्रो चिप; महापालिकेच्या अभिनव योजनेला सुरुवात

## पुणे महापालिका हद्दीतील वाढत्या भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका हद्दीतील आणि नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील वाढत्या भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील सर्व महापालिकांना भटक्या श्वानांच्या संख्येवर प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिल्यानंतर, पुणे महापालिकेने श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रियेसह मायक्रोचिप बसविण्याची अभिनव योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत, शुक्रवारी (दि. ७) कात्रज येथील नसबंदी शस्त्रक्रिया केंद्रात तीन भटक्या श्वानांच्या प्रथमच मायक्रोचिप बसविण्यात आल्या.



### प्रथमच मायक्रोचिप बसविण्यात आल्या

» एका प्राणीप्रेमी महिलेच्या सहकार्याने मोहम्मदवाडी व हडपसर परिसरातील तीन भटक्या श्वानांच्या त्वचेमध्ये प्रथमच मायक्रोचिप बसविण्यात आल्या आहेत. या मायक्रोचिप प्रणालीमुळे प्रत्येक कुत्र्याचा डिजिटल रेकॉर्ड तयार होईल. त्यामुळे त्यांची ओळख पटविणे, लसीकरणाचा मागोवा घेणे आणि त्याच त्या श्वानांवर पुन्हा नसबंदी होण्याचा धोका टाळणे सोपे होणार आहे. या उपक्रमामुळे 'रेबीजमुक्त पुणे' या मोहिमेला मोठा हातभार लागणार आहे.

या संदर्भात, अतिरिक्त महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत भटक्या कुत्र्यांना नसबंदी शस्त्रक्रिया करताना त्यांच्यात मायक्रोचिप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. या मायक्रोचिपच्या माध्यमातून प्रत्येक कुत्र्याची ओळख, रंग, ठिकाण, नसबंदी शस्त्रक्रियेची तारीख, लसीकरणाचा दिनांक, तसेच संबंधित संस्था आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणार आहे. या तंत्रज्ञानामुळे भटक्या श्वानांचे संगोपन, पुनर्लसीकरण आणि रेबीज नियंत्रणाच्या कामात अधिक पारदर्शकता आणि अचूकता येणार आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने या निर्णयास मान्यता दिली असून, महापालिकेसोबत कार्यरत असलेल्या सर्व संस्थांना नसबंदी शस्त्रक्रिये दरम्यान मायक्रोचिप बसविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

> स्वयंसेवी संस्थेमार्फत भटक्या श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रियेसोबत मायक्रोचिप बसविण्यास प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात करण्यात आली आहे. दोन महिन्यांत टप्प्याटप्प्याने शहरातील विविध भागांतील सुमारे ६०० भटक्या श्वानांमध्ये मायक्रोचिप बसविण्यात येणार आहे. त्यानंतर स्कॅनिंगद्वारे त्यांचे निरीक्षण व परीक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतरच शहरातील सर्व भटक्या श्वानांमध्ये मायक्रोचिप बसविण्यासाठी खरेदीचा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविण्यात येणार आहे.
>
> - डॉ. सारिका भोसले-फुंडे,
> पशुवैद्यक अधिकारी, पुणे महापालिका.

न्यायालयाच्या आदेशानुसार दोन आठवड्यात भटक्या श्वानांना हलवण्यासाठी यंत्रणा तयार करण्यात येणार आहेत. टप्प्या टप्प्याने या गोष्टी करण्यात येणार आहेत. सार्वजनिक ठिकाणांवरील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येवर वेळीच उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने शाळा, रुग्णालये, रेल्वे स्थानके आणि बस स्थानके यासारख्या सार्वजनिक आस्थापनांच्या परिसरातून सर्व भटकी कुत्री त्वरित हटवून, त्यांची नसबंदी करून त्यांना पाळीव प्राणी निवारागृहात हलवावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यातील महापालिकांना दिले आहेत. एका प्राणीप्रेमी महिलेच्या सहकार्याने मोहम्मदवाडी व हडपसर परिसरातील तीन भटक्या श्वानांच्या त्वचेमध्ये प्रथमच मायक्रोचिप बसविण्यात आल्या आहेत. या मायक्रोचिप प्रणालीमुळे प्रत्येक कुत्र्याचा डिजिटल रेकॉर्ड तयार होईल. त्यामुळे त्यांची ओळख पटविणे, लसीकरणाचा मागोवा घेणे आणि त्याच त्या श्वानांवर पुन्हा नसबंदी होण्याचा धोका टाळणे सोपे होणार आहे. या उपक्रमामुळे 'रेबीजमुक्त पुणे' या मोहिमेला मोठा हातभार लागणार आहे.

# निलंबित तहसीलदार येवलेंनी दिलेल्या निर्णयांची फेरतपासणी

## बोपोडी येथील जमीन खरेदी प्रकरणातील निलंबित पुणे शहर तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे सर्व निर्णय, आदेशांची फेरतपासणी होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीच्या मुंढवा आणि बोपोडी येथील जमीन खरेदी प्रकरणातील निलंबित पुणे शहर तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे सर्व निर्णय, आदेशांची फेरतपासणी होणार आहे. जिल्हा प्रशासनाने तसा निर्णय घेतला असून यात काही संशयास्पद आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

बोपोडी येथील कृषी महाविद्यालयाच्या मालकीची १३ एकर जागा चुकीच्या



पद्धतीने कुळांच्या नावे करण्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर डुडी यांनी येवले यांचे निलंबन करावे, अशी शिफारस राज्य शासनाकडे करण्यात आली होती. त्यानंतर राज्य शासनाने त्यांचे निलंबन केले होते. 'मुंढवा आणि बोपोडी येथील प्रकरणांमध्ये येवले दोषी आढळल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणी विभागीय चौकशी समितीने नोंदविलेल्या विविध मुद्द्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. पदावनत, वेतनवाढ रोखणे किंवा अन्य प्रशासकीय दंडात्मक कारवाई केली जाईल. मुंढव्यातील जमिनीचे हस्तांतर प्रत्यक्षात झालेले नाही. तहसीलदार येवले यांनी दिलेले आदेश प्रांताधिकाऱ्यांकडून रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.. कुणाला जमीन देण्याबद्दलचा येवले यांचा आदेश त्याची कार्यवाही आणि अंमल झालेला नाही असे जिल्हाधिकारी दुडी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या जमिनीचे हस्तांतर झाले नाही. मात्र या प्रकरणांमध्ये संगणमत करून जमीन हडप करण्याचा प्रकार झाल्याने गुन्हा दाखल झाला आहे.

### दोषी आढळल्यास कठोर कारवाई

» सूर्यकांत येवले यांची विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. त्यात तपासणी करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या आधारे त्यांच्यावर कारवाई होणार आहे. त्याचबरोबर निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी पुणे शहर तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर दिलेले निर्णय, आदेशांचीही फेरतपासणी केली जाईल. त्यात सूर्यकांत येवले दोषी आढळल्यास त्यांच्यावर पुढील आणखीन कारवाई होईल.

# राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहणार की भाजप गड जिंकणार?

## नगराध्यक्ष पद थेट जनतेतून निवडले जाणार असल्याने इंदापूरमध्ये लढत अतिशय चुरशीची होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर नगरपरिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीची औपचारिक सुरुवात सोमवारी (दि. 10 नोव्हेंबर) उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेसह होत असून, शहरातील राजकीय तापमान झपाट्याने वाढले आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह स्थानिक गट, स्वतंत्र उमेदवार आणि नव्याने उदयास आलेले सामाजिक संघटनात्मक गट या निवडणुकीत आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी सज्ज झाले आहेत.या वेळी नगराध्यक्ष पद थेट जनतेतून निवडले जाणार असल्याने इंदापूरमध्ये लढत अतिशय चुरशीची होणार आहे.

सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये उमेदवारीसाठी हालचाली जोरात सुरू आहेत. शहरातील राजकीय नकाशावर गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) आणि भारतीय जनता पक्ष या दोन गटांचा प्रभाव राहिला आहे. मात्र, आता काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), मनसे, तसेच अपक्ष सामाजिक कार्यकर्तेही आपले अस्तित्व दाखविण्याच्या तयारीत आहेत.इंदापूर हे परंपरेने राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानले जाते.

मंत्री दत्तात्रय भरणे यांचा प्रभाव शहरात कायम असून, राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून नगराध्यक्षपदासाठी कोणाला उमेदवारी दिली जाणार याकडे लक्ष लागले आहे. त्याचवेळी, भाजप जोरदार तयारी सुरू आहे. विकास, पारदर्शकता आणि नव्या चेहऱ्यांवर विश्वास या भूमिकेतून भाजपची मोहिम सुरू होणार असल्याची चर्चा आहे.या निवडणुकीत युवक उमेदवार, व्यावसायिक आणि समाजसेवक वर्गातून नव्या चेहऱ्यांचे प्रवेशही होत आहेत.



### उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची गर्दी

» राजकारणात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणू या आश्वासनासह काही तरुण उमेदवार तयारीत आहेत. त्यामुळे जुन्या आणि नव्या नेतृत्वात स्पर्धा तीव्र होणार आहे.नगरपरिषद कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची आजपासून गर्दी वाढली आहे. दाखले, अनामत रक्कम आणि पडताळणीसाठी प्रशासनाने स्वतंत्र व्यवस्था केली आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 17 नोव्हेंबर असून, त्यानंतर उमेदवारांचे नशीब अर्जछाननीवर ठरणार आहे.

### प्रमुख मुद्दे : पाणी, रस्ते आणि स्वच्छता

» इंदापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत शहरातील नागरिकांच्या मूलभूत समस्या – पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरवस्था आणि वाहतुकीतील अडचणी हे मुख्य निवडणूक मुद्दे राहतील. शिवाय, स्मार्ट सिटीसारखा विकास आणि शहराच्या वाढत्या लोकसंख्येस अनुरूप नियोजन या बाबींवर प्रत्येक पक्ष आपला ब्लूप्रिंट सादर करणार आहे.

### जनतेचा कल कोणाकडे ?

» शहरात सध्या राजकीय चर्चांना वेग आला आहे. एका बाजूला अनुभवी नेतृत्वाचा प्रभाव, तर दुसऱ्या बाजूला नव्या पिढीचा आत्मविश्वास – या दोन घटकांमुळे इंदापूरची निवडणूक रंगतदार होणार हे निश्चित आहे.प्रत्येक गल्लीतील पॅनेल आणि स्थानिक राजकीय समीकरणांवरच यावेळी निकाल ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

प्रमुख राजकीय पक्षांसह स्थानिक गट, स्वतंत्र उमेदवार आणि नव्याने उदयास आलेले सामाजिक संघटनात्मक गट या निवडणुकीत आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी सज्ज झाले आहेत.या वेळी नगराध्यक्ष पद थेट जनतेतून निवडले जाणार असल्याने इंदापूरमध्ये लढत अतिशय चुरशीची होणार आहे.

एका बाजूला अनुभवी नेतृत्वाचा प्रभाव, तर दुसऱ्या बाजूला नव्या पिढीचा आत्मविश्वास – या दोन घटकांमुळे इंदापूरची निवडणूक रंगतदार होणार हे निश्चित आहे.प्रत्येक गल्लीतील पॅनेल आणि स्थानिक राजकीय समीकरणांवरच यावेळी निकाल ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# भोरमध्ये भाजपला मोठे खिंडार; माजी नगराध्यक्ष निर्मला आवारे पतीसह अजित पवार गटात दाखल

## पुणे येथे पक्षप्रवेशाचा सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार व भोर विधानसभेचे आमदार शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

**पुणे | प्रतिनिधी**

भोरच्या माजी नगराध्यक्ष निर्मला आवारे व माजी उपनगराध्यक्ष रामचंद्र आवारे यांनी इतर कार्यकर्त्यांसह भाजपा पक्षाला रामराम करीत राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला. यामुळे आगामी होणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीची राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. पुणे येथे पक्षप्रवेशाचा सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार व भोरविधानसभेचे आमदार शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी माजी नगराध्यक्ष निर्मला आवारे व माजी उपनगराध्यक्ष रामचंद्र आवारे, ऋषभ आवारे यांच्यासह माजी नगरसेवक गजानन शेटे, अमित जाधव, बाळा शेटे, चेतन उल्हाळकर, विजया उल्हाळकर, स्नेहा उल्हाळकर, ऋषिकेश शेटे, अनिकेत माने, स्वप्निल तारू, प्रथमेश गाढवे, विशाल मोहिते, गणेश घोणे, संतोष बारटक्के, नितीन झणझणे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.



भोर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदावर कार्यरत असताना निर्मला आवारे यांनी शहरात अनेक विकासकामे राबविली आहेत. नगरपालिकेतील विविध विषयांवर त्यांनी पुढाकार घेत नागरिकांचा विश्वास संपादन केला होता. मात्र, अलीकडच्या काळात पक्षात अंतर्गत मतभेद झाल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांकडून समजते.

या पक्षप्रवेश सोहळ्याच्या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी "भोर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करणाऱ्यांना योग्य मान-सन्मान आणि स्थान मिळेल," असे आश्वासन त्यांनी दिले. यादरम्यान आमदार शंकर मांडेकर यांनीही आवारे दांपत्य आणि सहकाऱ्यांचे स्वागत करत, त्यांच्या अनुभवाचा फायदा पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी होईल, असे म्हटले.

### भाजपाला खिंडार..

» भोरमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या प्रवेशामुळे राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.भोर शहरात भाजपला खिंडार पडले असून राष्ट्रवादी काँग्रेसला या नव्या बळामुळे स्थानिक राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले आहे.